| MHNG100007512024 | दाखल तारीख | | ०१-०६-२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | | ०१-०६-२०२४ |
| | निकाल तारीख | | १०-०३-२०२६ |
| | कालावधी | | ०१ ०९ ०९ |
| | | | वर्षे महिने दिवस |

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, न्यायालय क्र.२, उमरेड यांच्या न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी आर.एस.मानकर)**

**नि.फौ.ख.क्र.४७/२०२४**
**न्यायनिर्णय नि.क्र.२४**

| | | | |
|---|---|---|---|
| अभियोग पक्ष | : | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस स्टेशन बेला, | |
| तर्फे विधिज्ञ | : | सहा.सरकारी अभियोक्ता श्री.जे.एम.बोरकर | |
| **- विरुध्द -** | | | |
| आरोपी | : | | **१.दिपक गंगाधर करूटकार.**<br>वय ३३ वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हर,<br><br>**२.अमोल शास्त्री अंडसकर.**<br>वय २६ वर्षे, व्यवसाय – क्लीनर,<br>दोन्ही रा.कान्पा टेन्पा ता.नागभिड, जि.चंद्रपुर. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | : | | श्री सलिम शेख |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | ०४-०२-२०२४ |
| पहीली खबर दिनांक | : | ०४-०२-२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | : | ०१-०६-२०२४ |
| दोषारोप निश्चित दिनांक | : | २३-०४-२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १८-०९-२०२५ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | ०७-०३-२०२६ |

**महाराष्ट्र शासन वि दिपक**
**नि.क्र.२४**

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णय दिनांक | : | १०-०३-२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, असल्यास | : | - |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटकेची तारिख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशिल | कलम ४२८ फौ.प्र.संहीतेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | दिपक गंगाधर करूटकार | ०४.०२.२०२६ | ०५.०२.२०२४ | भारतीय दंड संहिता कलम ३७९ सह ३४, खान व खणीजे अधिनियम कलम ४७(७),४८(८), ४, २१ | निर्दोष | – | निरंक |
| २. | अमोल शास्त्री अंडसकर. | ०४.०२.२०२६ | ०५.०२.२०२४ | भारतीय दंड संहिता कलम ३७९सह ३४, खान व खणीजे अधिनियम कलम ४७(७),४८(८), ४, २१ | निर्दोष | – | निरंक |

## अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

### अ) अभियोग पक्ष -

| क्रमांक | नाव | | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | पो.ह.हरिदास देविदास चाचरकर | : | फिर्यादी नि.क्र.६ |
| २ | प्रितम राजु रोकडे | : | पंच साक्षीदार नि.क्र.११ |
| ३ | प्रदिप शालिकराव गावंडे | : | पंच साक्षीदार नि.क्र.१३ |
| ४ | पो.ह.कृणाल मोहणसिंग ठाकुर | : | तपासी अंमलदार नि.क्र.१६ |

### ब) आरोपी तर्फे साक्षीदार, असल्यास

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

महाराष्ट्र शासन वि दिपक
नि.क्र.२४

**क) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालया चे निशाणी क्रमांकाची यादी**
**अ) अभियोग पक्ष -**

| अ.क्रं. | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| १ | नि. क्र.०७ | फिर्याद |
| २ | नि. क्र.०८ | प्रथम खबर अहवाल |
| ३ | नि. क्र.०९ | समन्सपत्र |
| ४ | नि. क्र.१० | घटनास्थळ व जप्ती पंचनामा |
| ५ | नि.क्र.१२ | घटनास्थळ पंचनाम्यावरिल सही |
| ६ | नि.क्र.१४ | समन्सपत्रा वरिल सही |
| ७ | नि.क्र.१५ | घटनास्थळ पंचनाम्यावरिल सही |
| ८ | नि.क्र.१७ व १८ | तहसिलदार व आर.टी.ओ यांना पाठविलेले पत्र |
| ९ | नि.क्र.१९ | ६५बी चे प्रमाणपत्र |
| १० | नि.क्र.२० | सा.क्र.३ प्रदिप शालीक गावंडे यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ |
| ११ | नि.क्र.२१ | सा.क्र.२ प्रितम राजु रोकडे यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ |

**ब) आरोपी /बचाव पक्षाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

**क) न्यायालयाचे साक्षीदार**

| अनुक्रमांक | निशाणी क्रं. | तपशिल |
|---|---|---|
| ..........निरंक............. | | |

महाराष्ट्र शासन वि दिपक
नि.क्र.२४

**गुन्हा कलम ३७९ सह ३४,१०९ भारतीय दंड संहिता, कलम ४७(७),४८(८) महा. जमिन महसुल अधिनियम कलम ४,२१ खाण व खणिजे अधिनियम अन्वये.**

**न्यायनिर्णय**
**(दिनांक १० मार्च,२०२६)**

प्रस्तुतचा खटला हा आरोपींविरूध्द गुन्हा कलम ३७९ सह ३४ भारतीय दंड संहिता, कलम ४७(७), ४८(८) महा. जमिन महसुल अधिनियम कलम ४, २१ खाण व खणिजे अधिनियम प्रमाणे आरोप ठेवून चालविण्यात आला आहे.

**अभियोग पक्षातर्फे थोडक्यात हकीकत अशी आहे की -**

**०२.** फिर्यादी पो.हवा. हरिदास चाचरकर यांनी त्यांच्या फिर्यादमध्ये असे सांगितले आहे की, ते दिनांक ०४/०२/२०२४ रोजी ते पेट्रोलिंग करत असतांना त्यांना माहिती मिळाली की, मौजा नांद ते सिर्सी गावाकडे विना परवाना रेतीने भरलेले १२ चक्का टिप्पर क्र.एम.एच.४० सी.यु.७३३३ येत आहे. अशा माहितीवरून पंचांना घेउन त्यांनी सिर्सी गिरड रोडवर नाकाबंदी केली असता, दि.०४/०२/२०२४ रोजी ८.१० वाजताच्या दरम्यान सिर्सी गावाला लागुन असलेल्या रंगनाथ मंदीर जवळ १२ चक्का टिप्पर क्र.एम.एच.४० सी. यु.७३३३ येतांना दिसला. पंचासमक्ष नाकाबंदी दरम्यान टिप्पर थांबवुन सदर टिप्परची पाहनी केली असता सदर टिप्परमध्ये रेती भरलेली दिसुन आले. चालकास त्याचे नाव गाव व पत्ता विचारले. तसेच त्यांना रॅायल्टी विचारली असता त्यांनी रॅायल्टी नसल्याचे सांगितले. सदर रेती ही विना परवाना अवैध्यरित्या वाहतुक करित असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांच्याविरूध्द त्यांनी पो.स्टेशनला रिपोर्ट दिली.

**०३.** फिर्यादीच्या रिपोर्टवरुन आरोपीविरुध्द उमरेड पो.स्टे.येथे गुन्हा

क्र.३४/२०२४ नोंदविण्यात आला. सदर प्रकरणात आरोपींविरुध्द नि.क्र.०३ प्रमाणे कलम ३७९ सह ३४ भारतीय दंड संहिता, कलम ४७(७),४८(८) महा. जमिन महसुल अधिनियम कलम ४,२१ खाण व खणिजे अधिनियम प्रमाणे आरोप ठेवला.

**०४.** सदर प्रकरणात आरोपीविरुध्द गुन्हा दर्शक पुरावा अभिलेखावर मिळून आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि. क्र.२२ व २३ प्रमाणे नोंदविण्यात आले.

**०५.** सदर प्रकरणामध्ये खालील मुद्दे विचारार्थ आले ते निष्कर्षासह व कारणमिमांसेह पुढील प्रमाणे -

| **अनु.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने सिध्द केले काय की, दि.०४-०२-२०२४ रोजी ७.३० वाजताच्या दरम्यान मौजा सिर्सी, ता.उमरेड, जि.नागपूर येथे तुम्ही आरोपींनी तुमच्या समान हिताकरिता हेतुपरस्सर १० ब्रास रेती जिची किंमत ५०,०००/- टिप्पर क्र.एम.एच-४० सी.यु.७३३३ मध्ये सरकारच्या संमतीशिवाय चोरून नेली आणि व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेचे कलम ३७९ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | **नाही** |
| २ | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमच्या समान हिताकरिता तुमच्याकडे रितसर परवाना नसतांना रेती चोरून नेली आणि त्याद्वारे तुम्ही महाराष्ट्र जमिन महसुल कायदा कलम ४७(७), ४८(८) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली काय? | **नाही** |
| ३ | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमच्या | |

| | | |
|---|---|---|
| | समान हिताकरिता तुमच्याकडे रितसर परवाना नसतांना रेती चोरून नेली आणि त्याद्वारे तुम्ही खाण व खणिजे अधिनियम, १९५७ चे कलम ४ सह २१ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला ही बाब अभियोग पक्षाने सिध्द केली काय? | **नाही** |
| ४ | आदेश काय ? | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत** :-

**०६.** फौजदारी कायद्याचे तत्व आहे की, आरोपीविरुध्द गुन्हा सर्व संशयापलीकडे जाऊन सिध्द करण्याचा संपूर्ण भार हा अभियोगपक्षावर असतो. सदर प्रकरणात आरोपी यानी त्यांच्या समान हितासाठी सरकारच्या संमतीशिवाय रेती चोरून नेली या बाबी अभियोगपक्षाने संशयापलिकडे सिध्द करणे आवश्यक आहे.

**०७.** अभियोगपक्षातर्फे सा.क्र.१ पो.हे.कॉन्स्टेबल हरिदास देविदास चाचरकर हे फिर्यादी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये सांगितले आहे की, दि.०४/०२/२०२४ रोजी ते पो.स्टे.कुही येथे कार्यरत होतो. सदर दिवशी ते पेट्रोलिंग कामी कर्तव्यावर होते व त्यावेळी त्यांच्यासोबत इतर कर्मचारी होते. सदर दिवशी त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक ट्रक नांद ते सिर्सी मार्गे येत आहे त्यामध्ये अवैध रेती भरून येत आहे. त्यानंतर त्यांनी नाकेबंदी लावली, पंचांना बोलावुन त्यांना लेखी सुचनापत्र दिले व माहिती सांगितली. त्यानंतर एक ट्रक ज्याचा नोंदणी क्र.एम.एच-४० सी.यु.७३३३ असा आला त्याला थांबवुन. त्यांना रॉयल्टीबाबत विचारणा केली असता चालकाने कोणतीही रॉयल्टी नसल्याबाबत सांगितले. त्यानंतर त्यांनी सदर ट्रक चालक,

रेती भरलेला ट्रक पो.स्टेशनला घेउन गेले. त्यानंतर फिर्याद दिली. त्यांना नि.क्र.७ वरिल फिर्याद दाखविण्यात आली असता त्यावर त्यांची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. तसेच त्यांना नि.क्र.८ वरिल प्रथम खबर अहवाल दाखविंण्यात आला असता त्यावर त्या ची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तसेच त्यांना नि.क्र.९ वरिल समन्सपत्र दाखविले असता त्यावर त्यांची व पंचांची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांना नि.क्र.१० वरिल घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविला असता त्यावर त्यांची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे असे सांगितले.

**०८.** त्यानंतर अभियोग पक्षाने कृणाल मोहणसिंग ठाकूर पो.हवा साक्षीदार क्र.०४ यांची साक्ष नोंदविली. त्यांनी घटनेचा तपास कसा केला याबाबत सविस्तर सांगितले आहे. त्यांनी तहसिलदारास व आर.टी.ओ. यांना पत्रे पाठविली होती. सदर पत्रे नि.क्र.१७ व १८ वर असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी नि.क्र.१९ अन्वये ६५बी चे प्रमाणपत्र तयार केले. त्यानंतर त्यांनी सा.क्र.३ श्री. प्रदिप गावंडे यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता असे सांगितले व सदर अधोरेखांकित भाग अ यास नि.क्र.२० देण्यात आला. तसेच त्यांनी सा.क्र.२ श्री. प्रितम रोकडे यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला होता असे सांगितले व सदर अधोरेखांकित भाग अ यास नि.क्र.२१ देण्यात आला. त्यांनी फिर्यादीच्या साक्षीस सुसंगत अशी साक्ष दिली. त्यानंतर सा.क्र.२ श्री.प्रितम रोकडे व सा.क्र.३ श्री. प्रदिप गावंडे घटनास्थळ पंच यांची साक्ष नोंदविली त्यांनी अभियोगपक्षास पाठपुरावा केलेला नाही.

**०९.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.जे.एम.बोरकर व आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.पि.एस.हूंगे यांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता

यांनी युक्तीवाद करून सागितले की, अभियोग पक्षाने आरोपीवरिल दोषारोप सिध्द केलेला आहे. तसेच सा.क्र.०४ यांनी फिर्यादीच्या साक्षीस पाठपुरावा केलेला आहे तसेच घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा सिध्द झालेला आहे. त्यामुळे आरोपीला योग्य ती शिक्षा द्यावी अशी विनंती केली. याउलट आरोपीच्या वकीलांनी युक्तीवाद करून सांगितले की, फिर्यादीने त्याच्या साक्षीमध्ये आरोपीने नेमके रेती कोठून आणली याबाबत तारतम्यता असल्याचे दिसुन येत नाही. तसेच सदर रेती ही सरकारच्या मालकीची अथवा सरकारच्या ताब्यात होती ही बाब शाबीद करण्याकामी कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे आरोपीची निर्दोश मुक्तता करण्यात यावी अशी विनंती केली.

**१०.** फिर्यादी पो.हे.कॉन्स्टेबल हरिदार चाचरकर (सा.क्र.१) यांनी त्यांच्या साक्षीमध्ये घटनेची तारिख, वेळ व ठिकाण याबाबत फिर्यादीतील मजकुराशी सुसंगत अशी साक्ष दिलेली आहे. त्यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, त्यांनी नाकाबंदी करून ट्रक क्र.एम.एच-४० सी.यु.७३३३ ला थांबवुन ट्रक चालकाला रॉयल्टीबाबत विचारणा केली असता त्याने रॉयल्टी नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी दोन पंचासमक्ष पंचनामा तयार केला. त्यानंतर ट्रक चालक रेती भरलेल्या ट्रकसह पो. स्टे. बेला येथे आणले. सदर ट्रकमध्ये १० ब्रास रेती होती. त्यानंतर त्यांनी फिर्याद दिली. त्याना घटनास्थळ पंचनामा, समन्स, फिर्याद व प्रथम खबल अहवाल नि.क्र.७ ते १० दाखविले असता त्यावर त्यांची सही आहे व त्यातील मजकुर बरोबर असल्याचे सांगितले. तसेच पंचनाम्यावर पंचांच्या सह्या असल्याचे सांगितले. त्यांच्या साक्षीस सा.क्र.४ कृणाल तपासी अंमलदार यांनी पाठपुरावा केला व घटनेचा तपास त्यांनी कसा केला याबाबत सविस्तर सांगितले.

**११.** फिर्यादी यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले. त्यांनी त्यांच्या

महाराष्ट्र शासन वि दिपक
नि.क्र.२४

उलटतपासामध्ये अमान्य केले आहे की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून त्यांनी खोटी कारवाई केली. परंतु, त्यांच्या साक्षीमध्ये आरोपींनी सदरची रेती ही कोठुन आणली होती, कोणाच्या मालकीची होती याबाबत कोठेही काहीही सांगितलेले नाही.

**१२.** त्यानंतर तपासी अंमलदार कृणाल ठाकुर यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता त्यांनी देखिल आरोपीवर कारवाई केली व रेतीसह टिप्पर जप्त केला असे सांगतात. परंतु, त्यांच्याही साक्षीमध्ये जप्त केलेली रेती कोणाच्या मालकीची होती याबाबत कोणताही दस्तऐवज त्यांनी तपासादरम्यान हस्तगत केल्याचे कोठेही सांगितलेले नाही. त्यामुळे आरोपीकडून जप्त केलेली रेती ही कुणाच्या संमतीशिवाय व कुणाच्या ताब्यातुन आरोपीने आणली होती, तसेच आरोपींनी कुणाच्या संमतीशिवाय रेती चोरून घेउन जात होते याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आल्याचे दिसुन येत नाही. तपासी अंमलदार यांच्या पुराव्याप्रमाणे त्यांनी तहसिलदार यांना पत्रव्यवहार केला. त्यांना नि.क्र.१७ वरिल पत्र दाखविले असता त्यातील मजकुर त्यांनी मान्य केला. परंतु, सदर पत्रावरून तहसिलदार यांनी आरोपीवर काय कारवाई केली याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येत नाही. त्यानंतर तपासी अंमलदार यांनी सा.क्र.३ श्री. प्रदिप व सा.क्र.२ श्री. प्रितम यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ नि.क्र.२० व २१ त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला असल्याचे सांगतात. परंतु, सा.क्र.२ व ३ हे अभियोगपक्षाविरूध्द का खोटे बोलत आहे? याबाबत काणताही पुरावा अभियोगपक्षाने अभिलेखावर आणल्याचे दिसुन येत नाही.

**१३.** तपासी अंमलदार कृणाल यांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, आरोपींनी सदर रेती कोठुन आणली याबाबत त्यांनी चौकशी केली होती व सदर चौकशी केल्याबाबत त्यानी दस्तऐवचज अभिलेखावर दाखल केला होता. परंतु, त्यांना अभिलेख दाखविला असता

त्यामध्ये आरोपींनी सदर रेती कोठुन आणली याबाबत दस्त अभिलेखावर नसल्याचे ते मान्य करतात. त्यामुळे आरोपीने सदर रेती कोणाच्या ताब्यातुन व कोणाच्या संमतीशिवाय चोरून घेउन जाण्याचा प्रयत्न केला ही बाब वरिल चर्चा केलेल्या पुराव्याच्या आधारे अभियोग पक्षाला संशयापलिकडे सिध्द करता आलेली नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्र.२ व ३ करिता:-</u>**

**१४.** खाण व खणिजे अधिनियम तसेच सार्वजनिक संपत्तीचे नुकसान प्रतिबंधक कायदा याप्रमाणे संबंधित अधिकारी यांनी तक्रार दाखल करणे गरजेचे आहे. परंतु, सदर प्रकरणामध्ये संबंधित अधिकारी यांनी तक्रार दाखल केल्याचे दिसुन येत नाही. तसेच महाराष्ट्र महसुल अधिनियम कलम ४७(७), ४८(८) यामधील कार्यवाही ही महसुल अधिकारी यांनी स्वतंत्रपणे करणे गरजेचे असते. जरी तपासी अंमलदार यांनी आरोपीवर कारवाई करण्याकामी सदर महसुल अधिनियमा अंतर्गत पत्र पाठविले असल्याचे सांगितले असले, तरी सदर पत्रावरून महसुल अधिकारी यांनी काय कारवाई केली? त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केल्याचे दिसुन येत नाही. एकंदरित वरिल चर्चेच्या अनुषंगाने मी मी मुद्दे क्र.०२ व ०३ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र.०४ साठी खालील आदेश पारित करित आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी क्र.**१) दिपक गंगाधर करूटकार व आरोपी क्र.२)अमोल शास्त्री अंडसकर** यांची **कलम ३७९ सह ३४,१०९ भारतीय दंड संहिता, कलम ४७(७), ४८(८) महा. जमिन महसुल अधिनियम कलम ४, २१ खाण व खणिजे अधिनियम** अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

**३.** आरोपीने कलम ४३७-अ फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रक्कम रुपये १५,०००/- प्रत्येकी पुढील सहा महिन्याकरीता वैयक्तीक बंधपत्र लिहून द्यावे.

**४.** मुद्देमाल टाटा कंपनीचा टिप्पर क्र. एम. एच.४० सी. यु.७३३३ हा सुपुर्तनाम्यावर दिल्याचे अभिलेखावरून दिसुन येत नाही. अपिल कालावधी संपल्यानंतर सदर टिप्पर सुप्रुतनाम्यावर सोडण्याचा अर्ज आल्यास. कागदपत्रांची पडताळणी करून सदर टिप्पर मुळ मालकास परत करावा. तसेच जप्त रेती १० ब्रास ही अपिल कालावधी संपल्यानंतर महसुल अधिकारी यांच्याकडे योग्य त्या कारवाईकरिता पाठविण्यात यावी.

**५.** न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अग्रघोषीत करण्यात आला.

RAVI SATYABHAN MANKAR
order
Digitally signed by RAVI SATYABHAN MANKAR
Date: 2026.03.12 12:04:09 +0530

उमरेड
दि.१०-०३-२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड

## Certificate

I affirm that the contents of this P. D.F. File Judgment are same word to word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Argued on | : | 10-03-2026 |
| Dictated on | : | 10-03-2026 |
| Transcribed on | : | 10-03-2026 |
| Checked & signed on | : | 10-03-2026 |

Name of Stenographer :S.B.Ghardinkar.